गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ५८ वा ● रविवार १४ जुलै २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 2 | Issue 58 | Date : 14/07/2024 blow Sunday Page 4 Price 4

# महाराष्ट्राला जगाचे शक्ती केंद्र तर मुंबईला फिनटेक कॅपिटल बनविणार : प्रधानमंत्री

*** प्रधानमंत्र्यांच्या हस्ते ठाणे–बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्पाचे भूमिपूजन. * गोरेगाव–मुलुंड जोडरस्ता प्रकल्पांतर्गत दुहेरी बोगद्याचे भूमिपूजन. * मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा शुभारंभ. * कल्याण यार्ड रिमॉडेलिंग प्रकल्प पायाभरणी. * लोकमान्य टिळक टर्मिनस येथे नवीन प्लॅटफॉर्मचे राष्ट्राला समर्पण. * छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे विस्तारित प्लॅटफॉर्म क्र. १० आणि ११ चे राष्ट्राला समर्पण. * तुर्भे गति शक्ती मल्टीमोडल कार्गो टर्मिनल प्रकल्पाची पायाभरणी.**

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : मुंबई हे देशाचे पॉवर हाऊस असून महाराष्ट्राला जगातील शक्ती केंद्र आणि मुंबईला फिनटेक कॅपिटल बनविणे हे स्वप्न असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज येथे सांगितले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज २९ हजार कोटींहून अधिक किमतीच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचे रिमोटद्वारे शुभारंभ, भूमिपूजन, पायाभरणी आणि लोकार्पण करण्यात आले. गोरेगाव मधील नेस्को प्रदर्शन सेंटरमध्ये झालेल्या या कार्यक्रमप्रसंगी राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा आदी उपस्थित होते.

**वाढवण बंदर प्रकल्पामुळे १० लाख रोजगार निर्मिती होणार**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले, मागील काही वर्षात मुंबई आणि परिसराची कनेक्टिव्हिटी वाढली आहे. येत्या काही वर्षात ती अधिक चांगली होईल. राज्यात विविध विकास प्रकल्प उभारले जात असून यामुळे रोजगारदेखील वाढत आहे. वाढवण बंदराला नुकतीच मंजुरी देण्यात आली असून ७६ हजार कोटींच्या या प्रकल्पामुळे दहा लाख रोजगार निर्मिती होणार आहे. महाराष्ट्र हे गुंतवणूकदारांचे आकर्षण केंद्र बनले असून केंद्र आणि राज्य सरकार अधिक वेगाने काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**महाराष्ट्र पर्यटनाचे हब बनावे**

महाराष्ट्राला गौरवशाली इतिहास आहे महाराष्ट्र हे उद्योग क्षेत्राचे शेती क्षेत्राचे तसेच वित्तक्षेत्राचे शक्ती केंद्र आहे. पर्यटन क्षेत्राला येथे मोठा वाव असून हे पर्यटनाचे हब बनावे अशी अपेक्षा प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी



व्यक्त केली. देशातील नागरिकांना गतीने विकास हवा असून यात मुंबईसह महाराष्ट्राचा मोठा वाटा असणार असल्याचे त्यांनी सांगितले महाराष्ट्रातील नागरिकांचे जीवन अधिक दर्जेदार करण्याचा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले सागरी किनारा मार्ग अटल सेतू अशा प्रकल्पांमुळे नागरिकांना मोठा लाभ होत असल्याचे त्यांनी नमूद केले दहा वर्षांपूर्वी मुंबईत आठ किलोमीटर मेट्रो धावत होती आज ती ८० किलोमीटर धावत असून २०० किलोमीटर मेट्रो नेटवर्कवर काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. आज भूमिपूजन होत असलेल्या मुंबईतील प्रकल्पांमुळे प्रवासाच्या वेळात वेळेत मोठी बचत होणार असल्याचे सांगून कनेक्टिव्हिटी वाढल्याने सर्वांना लाभ होणार असल्याचे श्री.मोदी म्हणाले. विविध तीर्थयात्रांमध्ये सुविधा वाढवणार असल्याचा उल्लेख करून पंतप्रधान श्री.मोदी यांनी पंढरपूर वारीसाठी पालखी मार्ग लवकरच सेवेत येतील असे सांगितले. राज्यात युवकांसाठी कौशल्य प्रशिक्षण आणि शिष्यवृत्ती दिली जात आहे. याचा युवकांना मोठा लाभ होईल, असे त्यांनी नमूद केले. राज्यात सर्वसामान्यांसाठी सुरू असलेल्या विविध योजनांचे त्यांनी यावेळी कौतुक केले.

**पायाभूत सुविधांमध्ये महाराष्ट्र अग्रेसर–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सूत्रे हाती घेतल्यानंतर मागील दहा वर्षात देशाने अभूतपूर्व प्रगती केली आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या भक्कम पाठिंब्यामुळे राज्यातही विविध विकास प्रकल्प पूर्ण होत असून विकासकामांना नवी गती मिळाली आहे. पायाभूत सुविधांमध्ये महाराष्ट्र अग्रेसर आहे. राज्यातील प्रत्येक योजनेला प्रधानमंत्री श्री. मोदी यांचा पाठिंबा मिळतो आहे. **। पान २ वर**

## तर २८८ आमदारही पाडणार आणि मुंबईलाही जाणार

### सरकारला जरांगे पाटलांचा इशारा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

छत्रपती संभाजीनगर : मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटलांनी सरकारला १३ जुलैपर्यंत अल्टिमेटम दिला होता. आज हा अल्टिमेटम संपला आहे. परंतु, अद्यापही सरकारने कोणतीही घोषणा केलेली नाही. त्यामुळे मनोज जरांगे यांचा पुढचं पाऊल काय असणार याकडे सर्वांचं लक्ष आहे. आज त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथे जाहीर सभा घेऊन मराठा बांधवांशी संवाद साधला आणि सरकारला पुन्हा एकदा संधी द्यायची असं ते म्हणाले. मराठा आरक्षणाच्या जनजागृतीसाठी मनोज जरांगे पाटलांनी शांतता फेरी काढली होती. याची सांगता आज छत्रपती संभाजी नगरमधील क्रांती चौकात झाली. क्रांती चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन केल्यानंतर जरांगे पाटलांनी लाखोंच्या जनसमुदायाशी संवाद साधला.



फडणवीस साहेब आता पडेल की नाही सरकार. महाविकास आघाडीवाले सरकार पडेल की नाही सरकार. महाविकास आघाडी किंवा महायुतीचं सरकार येत नसतंय आता एवढे लोक जमले आहेत. आहात का तयार? असं म्हणताच जनसमुदायातून एकच जल्लोषाचा आवाज आला. पण सरकारला वेदना कळणार नाहीत. सरकारने आपल्याकडून वेळ घेतल्यास बरोबर एक महिना झाला आहे. आजची रात्र सरकारच्या हातात आहे. मराठा आणि कुणबी एक आहे, सरसकट मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्यायचं, सगेसोयऱ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्यायचं, सर्व गुन्हे मागे घ्यायचे, असे एकूण ९ मागण्या आहेत, असं मनोज जरांगे म्हणाले.

संभाजी नगरच्या जनसागराच्या साक्षीने सरकारला जाहीर सांगतो की आजची रात्र तुमच्या हातात आहे. आम्ही केलेल्या ९ मागण्या मान्य कराव्यात. आज पहिल्या टप्प्याचा समारोप आहे. सर्व मराठ्यांना विश्र्वासात घेतल्याशिवाय निर्णय घ्यायचा नाही. म्हणून दीड करोड लोक आरक्षणात गेले आहेत. सरकारने जर आज रात्रीत आरक्षण दिलं नाही तर **। पान २ वर**



## सामाजिक क्रांती अभियान धम्मयात्रा पदयात्रा, भीमा कोरेगाव ते पंढरपूर

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः पूजनीय भिक्खू ज्ञानज्योती महास्थवीर व भिक्खू संघ यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक क्रांती अभियान धम्मयात्रा पदयात्रा, भीमा कोरेगाव ते पंढरपूर या यात्रेचे आगमन आज बोंडले शहरामध्ये झाले.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया सोलापूर जिल्हा अध्यक्ष सोमनाथ भोसले माळशिरस तालुका अध्यक्ष RPI मिलिंद सरतापे RPI माळशिरस तालुका उपाध्यक्ष महेंद्र लोंढे गावचे सरपंच देशमुख उद्धव मोरे हनुमंत लोंढे महेश लोंढे सिद्धार्थ लोंढे श्रीकांत लोंढे सुरज सोनवणे प्रकाश गायकवाड उदय गायकवाड अरूण मोरे युवराज मोरे यांनी परिश्रम घेतले व रविंद्र भाऊ लोंढे मित्रपरिवार बोंडले

## सात राज्यांतील पोटनिवडणुकीत इंडिया आघाडीचाच बोलबाला! भाजपाचा दारूण पराभव..

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीत अटीतटीच्या स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकावर राहिलेल्या इंडिया आघाडीने आता ७ राज्यांतील १३ विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत १० जागांवर विजय मिळवला आहे. तर, भाजपाने दोन जागा मिळवल्या असून एका जागेवर अपक्ष आमदार निवडून आला आहे.

बिहार, पश्र्िचम बंगाल, तामिळनाडू, मध्य प्रदेश, उत्तराखंड, पंजाब आणि हिमाचल प्रदेश या सात राज्यातील १३ जागांवर बुधवारी मतदान प्रक्रिया पार पडली. विविध पक्षांच्या विद्यमान आमदारांच्या मृत्यूमुळे किंवा राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या जागांमुळे पोटनिवडणूक घेण्यात आली. बिहारमधील रुपौली, पश्र्िचम बंगालमधील रायगंज, राणाघाट दक्षिण, बागडा आणि माणिकतला; तामिळनाडू मधील विक्रवंडी; मध्य प्रदेशातील



अमरवारा; उत्तराखंडमधील बद्रीनाथ आणि मंगळौर; पंजाबमधील जालंधर पश्र्िचम आणि हिमाचल प्रदेशातील देहरा, हमीरपूर आणि नालागढ या ठिकाणी मतदान झाले. आज सकाळपासून मतमोजणी सुरू झाली.

काँग्रेस, तृणमूल काँग्रेस (TMC), आप आणि द्रविड मुनेत्र कळघम (DMK) हे इंडिया आघाडीचे घटकपक्ष आहेत. यांनी पंजाब, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पश्र्िचम बंगाल, मध्य प्रदेश, बिहार आणि तामिळनाडू येथे बुधवारी झालेल्या पोटनिवडणुकीत उमेदवार उभे केले. पंजाबमध्ये आपचे मोहिंदर भगत यांनी जालंधर पश्र्िचम मतदारसंघात २३ हजार मतांनी विजय मिळवला. पश्र्िचम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसच्या उमेदवारांनी चार जागांवर आघाडी घेतली असून प्रत्येक मतदारसंघात भाजपा पिछाडीवर आहे. तृणमूल काँग्रेसने रायगंज, राणाघाट दक्षिण आणि बागडा विधानसभा जागा आरामात **। पान २ वर**

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सोलापूर जिल्हा दौरा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः राज्याचे मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे हे दिनांक १४ जुलै २०२४ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. रविवार दिनांक १४ जुलै २०२४ रोजी सकाळी दहा वाजता बारामती विमानतळ जिल्हा पुणे येथे आगमन. बारामती येथून शासकीय मोटारीने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर श्री क्षेत्र पंढरपूर कडे प्रयाण.दुपारी १२.०० वाजता आषाढी एकादशी वारीच्या अनुषंगाने पूर्वतयारी व पाहणी दौरा. दुपारी ३.०० वाजता पंढरपूर येथून बारामती विमानतळ कडे प्रयाण.

## नातेपुते नगरपंचायतीने वारकऱ्यांना नाविन्यपूर्ण सुविधा उपलब्ध केल्या, वारकरीही सुविधा बद्दल समाधानी!

### * राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष श्रीमती चाकणकर यांच्याकडून महिलांसाठी केलेल्या विशेष सुविधा बद्दल प्रशासनाचे कौतुक

### * जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली नातेपुते व माळशिरस नगरपंचायतीचे उत्कृष्ट नियोजन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः आषाढी वारी नमित्त संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्र्वर महाराज पालखीचे सोलापूर जिल्ह्यात दिनांक ११ जुलै २०२४ रोजी धर्मपुरी येथे आगमन झाले. पालकमंत्री चंद्रकांत पाटील व जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्ह्याच्या हद्दीत माऊली पालखीचे स्वागत केले. पालखीसोबत किमान चार लाख वारकरी पायी चालत आहेत.

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्र्वर महाराज पालखीचा पहिला मुक्काम नातेपुते नगरपंचायत येथे असतो. नातेपुते नगरपंचायतीचे मुख्याधिकारी माधव खांडेकर हे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली पालखीतील वारकऱ्यांना अत्यंत चांगल्या सोयी सुविधा देण्यासाठी मागील दोन महिन्यापासून नियोजन करत होते. पालखी मुक्कामी महिलांना स्नानाबाबत खूप अडचणी येतात. त्यासाठी नगरपंचायतीने ५८ स्वतंत्र स्नानगृहे उपलब्ध करून दिलेली होती. अशाच अनेक नाविन्यपूर्ण सुविधा नगरपंचायतीच्या वतीने देण्यात आल्यामुळे पालखीतील वारकरी व भाविक या सुविधाबद्दल खूप समाधानी होते. वारकऱ्यांचे समाधान हेच प्रशासनाने उत्कृष्ट काम केल्याची पावती होय.



**नातेपुते नगरपंचायतीने वारकऱ्यांसाठी उपलब्ध केलेल्या अन्य सुविधा पुढीलप्रमाणे...**

**स्वच्छता :** मागील एक महिन्यापासून पालखी तळाची स्वच्छता ,झाडेझुडपे काढणे,मुरुमीकरण करणे, गावामध्ये ज्या ठिकाणी दिंड्या थांबतात त्या ठिकाणी स्वच्छता करून देणे, गावामध्ये जंतुनाशक धूर फवारणी करणे इत्यादी स्वच्छता विषय कामे वेळेत पूर्ण करण्यात आले त्यासाठी नगरपालिकेचे ७५ सफाई कर्मचारी पूर्ण वेळ काम करत होते.

**मोबाईल टॉयलेट :** एकूण २० ठिकाणी १८०० मोबाईल टॉयलेट बसविण्यात आले होते, सदर शौचालयाचे वेळोवेळी साफसफाई जेट्टिंग मशीन च्याय सहायने करण्यात आली. शौचालयाचा प्रत्येक ठिकाणी १५ स्वच्छालय मागे एक सफाई कर्मचारी व २५ टॉयलेट मागे एक सुपरवायझर नेमण्यात आला होता. त्यावर नगरपंचायत च्या कर्मचाऱ्यांचे नियंत्रण ठेवण्यात आले होते. यामुळे सर्व टॉयलेट ठिकाणी पाणी स्वच्छता या सुविधा उपलब्ध झाले. वॉकी टॉकी च्या साह्याने नगरपंचायत नियंत्रक अधिकारी व मोबाईल टॉयलेट सुपरवायझर यामध्ये संवाद ठेवण्यात आला होता. सुलभ इंटरनॅशनल ची ४० शौचालय व स्नानगृह मोफत वारकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आले होते.शौचालयाला पाणीपुरवठा करणाऱ्या टँकर साठी स्वतंत्र फीडिंग पॉइट ठेवण्यात आला होता त्यामुळे टँकर वेळेवर भरून स्वच्छालय ठिकाणी येत होते

**महिला वारकऱ्यांसाठी विशेष सुविधा** : जिल्हाधिकारी महोदय यांच्या निर्देशामुळे महिला वारकऱ्यांना विशेष सुविधा देण्यावर भर देण्यात आलेला होता. यामध्ये महिला वारकऱ्यांसाठी तात्पुरते स्वतंत्र स्नानगृह तयार करण्यात आले होते, पालखीतळाच्या बाजूला एकूण ५८ स्वतंत्र महिला स्नानगृहामध्ये महिलांसाठी शॉवरच्या माध्यमातून अंघोळीची सोय करण्यात आली होती , त्याचबरोबर स्वतंत्र चेंजिंग रूमही तयार करण्यात आले होते. याचा लाभ हजारो महिला वारकऱ्यांनी घेतला व प्रशासनाकडून करण्यात येत **। पान २ वर**

# संपादकीय

## हेच आजचे राजकारण ..

हिदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे नाव या देशाच्या राष्ट्रीय प्रमुख व्यक्तींमध्ये सूचिबध्द झाले असल्यामुळे त्यांचे नाव आणि छायाचित्र आता सर्व पक्षांचे आणि विचारांचे झाले आहे. त्यामुळे सर्वच पक्ष आणि आघाड्या बाळासाहेब ठाकरे यांचे छायाचित्र आणि नाव आपापल्या निवडणूक प्रचारात आणि आघाडीच्या संकल्पनाम्यात किंवा वचननाम्यात वापरू शकतात. आता हा आनंदाचा आणि अभिमानाचाही मुद्दा आहे आणि अडचणींचाही. ज्या विचारांना बाळासाहेबांनी अनुसरले आणि भविष्यातील पिढ्यांनी ते अनुसरावे आणि पुढे न्यावे म्हणून ज्या समर्थ खांद्यावर त्यांनी आपल्या पक्षाची आणि संघटनेची जबाबदारी टाकली त्या उध्दव ठाकरे यांनाच आपल्याच पित्याच्या न्याय हक्कासाठी सर्वोच्च न्यायालयात सतत न्याय मागावा लागत आहे. म्हणून आता बाळासाहेबांच्या शिवसेनेला आणि उध्दव ठाकरे यांना न्याय देण्याची जबाबदारी ही सर्वोच्च न्यायालयाची आणि मुख्य न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांची आहे. या देशात संविधान सर्वोच्च आहे, हेच कायद्याच्या विद्यार्थ्यांना शिकवले जाते. पण राजकारणाचे धडे गिरवताना आम्हाला हे शिकायला मिळाले की, विधानसभा आणि विधान परिषद तसेच लोकसभा आणि राज्यसभा ही सर्वोच्च सभागृह आहेत आणि त्यांच्यासमोर सर्वोच्च न्यायालय देखील थिटे आहे. कारण लोकशाहीच्या मूळ व्याख्येनुसार लोकांनी लोकांसाठी निवडलेले लोकांचे प्रतिनिधी त्या सभेत बसतात आणि कायदे करतात. ते कायदे मंडळ आहे. या कायदे मंडळाने सर्वानुमते किंवा बहुमताने जे कायदे पारित केलेले असतात ते सर्वोच्च न्यायालयालाही मान्य करावे लागतात. मुख्यमंत्री किंवा प्रधानमंत्रीही जेव्हा राज्यकारभार करतात तेव्हा मंत्रिमंडळ जे ठरवते त्यावर मुख्य वा प्रधानपदी बसलेल्याने शिक्कामोर्तब करणे अपेक्षित असते. पण स्वातंत्र्यानंतर आपल्या देशातील सामान्यांची मानसिकता ही राजा बोले प्रजा डोले, अशी असल्यामुळे जो मुख्य वा प्रधानपदी असेल त्याच्याकडेच निर्णयाचे अधिकार जातात. यामुळे काही वेळेला न्याय आणि संविधानही पायदळी तुडवले जाते. जसे यावेळेस झाले. म्हणूनच आता सगळी भिस्त आहे ती केवळ सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींवरच. निवडणूक आयोग आणि सभापती यांनी दिलेले निवाडे सर्वोच्च न्यायालयात निकालासाठी प्रलंबित आहेत. जातीनिहाय प्राधान्य हेच आजचे राजकारण झाले आहे.

पान १ वरुन

## नातेपुते नगरपंचायतीने वारकऱ्यांना

असलेल्या सोयी सुविधा बद्दल आभार व्यक्त केले. या बरोबरच पुरुषांसाठी स्वतंत्र तीस शावर उभारण्यात आलेले होते .

**सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन** :महिलांसाठी सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन बसविण्यात आले होते या माध्यमातून महिलांना मोफत सॅनिटरी पॅड नगरपंचायतीच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आले.

**हिरकणी कक्ष** :लहान मुलांसाठी व स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष उभारण्यात आला होता .त्या ठिकाणी पाळणाघर, दूध सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती .त्याचबरोबर त्या ठिकाणी राज्य शासनाच्या महिलांसाठी असलेल्या योजनांची माहिती अंगणवाडी सेविका च्या माध्यमातून वारकऱ्यांना देण्यात येत होती. अशा सेविकांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची माहिती वारकऱ्यांना करून दिली

**राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षांची पाहणी** : राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीताई चाकणकर यांनी प्रशासनाच्या वतीने नातेपुते नगरपंचायत हद्दीत महिला वारकऱ्यांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांची पाहणी केली. रूपालीताई चाकणकर यांनी महिला स्नानगृह तसेच हिरकणी कक्षाचे उद्घाटन केले. सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन तसेच महिला स्नानगृह याची पाहणी करून समाधान व्यक्त केले. यावेळी जिल्हा प्रशासन प्रमुख जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व नातेपुते नगरपंचायत मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी भाविकांसाठी विशेषता महिला भाविकांसाठी उपलब्ध करून दिलेल्या सुविधाबाबत श्रीमती चाकणकर यांनी कौतुक केले. राज्य महिला आयोग महिला वारकऱ्यांसाठी सर्व प्रकारच्या सुविधा देण्याचे प्रयत्न करीत असल्याबाबत सांगितले.

**मोबाईल चार्जिंग कक्ष** : आजच्या काळाची गरज लक्षात घेऊन व वारकऱ्यांची होत असलेली अडचण लक्षात घेऊन नगरपंचायत व महावितरण चे वतीने पालखीतळावर मोबाईल चार्जिंग कक्ष उभारण्यात आलेला होता. पत्रा शेडमध्ये मोबाईल चार्जिंग साठी अनेक पॉईंट काढून देण्यात आले होते याचा लाभ अनेक वारकऱ्यांनी घेतला व समाधान व्यक्त केले.

**कचराकुंड्या:** पुणे पंढरपूर रस्त्यावर तसेच पालखी तळावर ठीक ठिकाणी कचरा गाड्या उभा करण्यात आल्या होत्या व त्या ठिकाणी सफाई कर्मचारी थांबून वेळोवेळी पडलेला कचरा उचलत होते त्यामुळे साफसफाईवर ताण निर्माण झाला नाही व वारकऱ्यांना त्रास झाला नाही.

**पाणीपुरवठा:** ज्ञानेश्र्वर माऊली पालखी मार्गावर शासनामार्फत एकूण ७६ टँकरच्या माध्यमातून वारकऱ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात येत आहे. वारकऱ्यांना चांगले आणि शुद्ध पाणी पिण्यासाठी उपलब्ध व्हावे म्हणून नगरपंचायतीमार्फत एकूण आठ ठिकाणी टँकर फीडींग पॉईंट ची सोय करण्यात आली होती त्यामध्ये टीसीएल टाकून पाणी टँकर मध्ये भरणा केले जात होते.

**विद्युत रोषणाई:** पालखीतळावर एकूण १५ हाय मस्ट व्यतिरिक्त ४०० वॅटचे एकूण ४२ दिवे जनरेटर च्या साह्याने चालू करून विद्युत पुरवठा करण्यात आला. त्यामुळे वारकऱ्यांना त्रास झाला नाही.

जेसीपी मधून पुष्पृष्टी करून माऊलींचे स्वागत नगरपंचायत प्रशासनाच्या वतीने माऊलींचे स्वागत पुष्पवृष्टी करून करण्यात आले.

जिल्हा प्रशासनाच्या वतीने आषाढी वारीमध्ये सोलापूर जिल्ह्यात येणाऱ्या वारकरी व भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. नातेपुते नगरपंचायतीने प्रथमच महिलांसाठी स्वतंत्र ५८ स्नानगृहे पाण्याच्या सुविधेसह उपलब्ध करून देऊन महिला वारकऱ्यांना कोणतही त्रास होणार नाही याची काळजी घेतली. सोलापूर जिल्हा प्रशासन स्थानिक प्रशासनाला सोबत घेऊन वारकऱ्यांच्या सेवेत अत्यंत चांगले काम करत आहे.

# विठू नामाच्या गजरात बाल वारकरी तल्लीन; वाबळेवाडी शाळेत विद्यार्थ्यांच्या दिंडीचे आयोजन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे : येथील उपक्रमशील जिल्हा परिषद आदर्श शाळा वाबळेवाडी येथे विद्यार्थ्यांच्या बाल दिंडीचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने विद्यार्थ्यांनी केलेली संतांची व महापुरुषांची वेशभूषा लक्ष वेधून घेत होती. भारत सोनवणे यांनी बाल वारकऱ्यांना गंध लावून कार्यक्रमाची सुरुवात केली. कानडा राजा पंढरीचा, टाळ बोले चिपळीला आदी प्रकारचे अभंग विद्यार्थ्यांनी सुरेख आवाजात गायले. विशेष म्हणजे त्याला विद्यार्थ्यांनीच संगीत दिले. सारा परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला. विठ्ठलाच्या प्रतिमेचे पूजन करून शाळेतून बाल दिंडीचे प्रस्थान झाले. विठू नामाचा जयघोष करत सर्व बाल वारकरी वाडीतून मार्गस्थ झाले. विद्यार्थ्यांनी गावातून पताका टाळ मृदंग तसेच डोक्यावर तुळस घेतली होती. या दिंडीत विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

गावाची प्रदक्षिणा पूर्ण झाल्यानंतर पालखी शालेय आवारातच विसाव्याला थांबली. मुलांनी गोल रिंगण करून तालात नाचत गात विठू नामाचा जयघोष चालू ठेवला. विद्यार्थ्यांनी तालासुरात अभंग गायले. यावेळी गावातील सर्व महिला, ग्रामस्थ, पालक आवर्जून मुलांचा बाल दिंडीचा सोहळा पाहण्यासाठी उपस्थित राहिले होते. महिलांनी व भाविकांनी अतिशय मनोभावे पालखीची व विणेकरी, संतांची वेशभूषा केलेल्या विद्यार्थ्यांची आणि तुळशीधारी बाल वारकऱ्यांची पूजा केली.



रिंगणामध्ये बाल वारकऱ्यांनी छोटे छोटे अतिशय उत्तम खेळ सादर केले. ग्रामस्थ व पालकांमुळे मुलांचा उत्साह आणखी द्विगुणीत झाला. मुलांनी उत्तम ठेक्यात 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' चा जयघोष सुरू केला. त्यानंतर सर्व मुलांनी पारंपरिक अशा फुगडीचा आनंद घेतला. उपक्रमशील शिक्षक पोपट दरंदले यांनी आरती व अभंग गायले. रिंगण सोहळा पार पडल्यानंतर शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला.

याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक,शिरूर तालुका प्राथमिक शिक्षक पतसंस्थेचे माजी चेअरमन व शिष्यवृत्ती तज्ञ विजय गोडसे, अरूणा घोडेकर, सुनिल पलांडे, जयश्री पलांडे, किरण अरगडे, गोरक काळे, प्रतिभा पुंडे, दीपक खैरे, तुषार सिनलकर, पोपट दरंदले, विद्या सपकाळ, वैशाली जगताप, गितांजली वाघोले आणि साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर उपस्थित होते. तर शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संदीप वाबळे, उपाध्यक्ष मल्हारी वाबळे, ग्रामपंचायत सदस्य प्रकाशकाका वाबळे, माजी सरपंच केशव वाबळे, यात्रा कमिटीचे अध्यक्ष अंकुश वाबळे, सतिश वाबळे, सुरेखा वाबळे, सतिश कोठावळे, प्रकाश विठ्ठल वाबळे आदी मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन लेखक सचिन बेंडभर यांनी केले. स्वागत तुषार सिनलकर, प्रास्ताविक किरण अरगडे तर आभार शाळेचे मुख्याध्यापक विजय गोडसे यांनी मानले. वाबळेवाडी शाळेच्या या उपक्रमाबद्दल केंद्रप्रमुख प्रकाश लंघे, विस्तार अधिकारी वंदना शिंदे, गटशिक्षणाधिकारी अनिल बाबर यांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक केले आहे.

## सात राज्यांतील पोटनिवडणुकीत..

७जिंकल्या आहेत. तर, मणिकतलामध्ये पक्ष आघाडीवर असून उमेदवार सुप्ती पांडे ४१ हजारपेक्षा जास्त मतांच्या फरकाने पुढे आहेत.

हिमाचलचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू यांच्या पत्नी कमलेश ठाकूर यांनी देहरा पोटनिवडणुकीत विजय मिळवला. तर, नालागढमध्येही काँग्रेसच्या हरदीप सिंग बावा यांचा विजय झाला आहे. हमीरपूरमध्ये भाजपाचे आशिष शर्मा जिंकले आहेत. उत्तराखंडमध्ये बद्रीनाथ आणि मंगळौर या दोन्ही जागांवर काँग्रेसच्या उमेदवारांनी आघाडी घेतली आहे. मंगळौर विधानसभा जागेसाठी मतमोजणीच्या दहा फेऱ्यांमध्ये काँग्रेसचे उमेदवार काझी मोहम्मद निजामुद्दीन यांनी भाजपाच्या कर्तारसिंग धना यांच्यावर ४०० पेक्षा जास्त मतांनी विजय मिळवला.

मध्य प्रदेशात अमरवार जागेवर काँग्रेसचे धीरेन शाह इनवती यांनी ४ हजार मतांची आघाडी घेतली आहे. दरम्यान, बिहारमध्ये JD(U) च्या कलाधर प्रसाद मंडळाने रुपौलीमध्ये आघाडी घेतली आहे आणि तामिळनाडूमध्ये, डीएमकेचे अन्नियर सिवा हे विक्रावंडी विधानसभा जागेवर १० हजारपेक्षा जास्त मतांनी आघाडीवर आहेत.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतरच्या या पहिल्या पोटनिवडणुका आहेत. त्यामुळे या निवडणुकीकडे सर्वांचं लक्ष होतं. लोकसभा निवडणुकीत भाजपाने २४० जागा जिंकल्या तर, एनडीएच्या साथीने २९३ जागा मिळवून भाजपाने सत्ता स्थापन केली. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीने २३२ जागा जिंकल्या.

## महाराष्ट्राला जगाचे शक्ती

उद्योगस्नेही राज्य अशी महाराष्ट्राची ओळख पुन्हा निर्माण होत आहे. आज भूमिपूजन होत असलेल्या प्रकल्पांचे लोकार्पण देखील प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या हस्ते होईल तसेच सुरक्षित, सुशोभित आणि भक्कम मुंबई घडवायची आहे त्यासाठी प्रधानमंत्री यांची साथ मिळेल, असा विश्र्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**पायाभूत सुविधांच्या जाळ्यांमुळे मुंबईचे चित्र बदलणार– उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या पाठिंब्यामुळे मुंबईत विविध विकासकामे होत असून पायाभूत सुविधा उभारण्यासाठी त्यांचे नाव इतिहासात लिहिले जाईल. २०१८ साली राज्याने मुंबईत कोठेही एका तासात प्रवास करता येईल अशी कनेक्टिव्हिटी तयार करण्याचा संकल्प केला होता, आज भूमिपूजन होत असलेल्या प्रकल्पांमधून ते साध्य होईल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला. मुंबईत होत असलेले विविध प्रकल्प हे पायाभूत सुविधांचे चमत्कार आहेत. या प्रकल्पांमुळे भविष्यात मुंबईचे संपूर्ण चित्र बदललेले असेल, असा विश्र्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून तरूणांना दिशा मिळेल–उपमुख्यमंत्री अजित पवार**

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, राज्य शासन लोकहिताचे निर्णय घेत असून विविध लोककल्याणकारी प्रकल्प वेगाने पूर्ण होत आहेत. युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून तरुणांना दिशा दाखवण्याचे काम होणार असल्याचा त्यांनी उल्लेख केला.

**प्रकल्पाविषयी माहिती**

मुंबईतील गोरेगाव स्थित नेस्को प्रदर्शन केंद्र येथे आयोजित कार्यक्रमात प्रधानमंत्री यांनी २९ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या रस्ते, रेल्वे आणि बंदर क्षेत्राशी संबंधित विविध प्रकल्पांचे उद्घाटन, लोकार्पण आणि पायाभरणी करण्यात आली.

ठाणे बोरिवली हा १६,६०० कोटी रुपये खर्चाचा बोगदा प्रकल्प आहे. ठाणे आणि बोरिवली दरम्यान हा दुहेरी ट्यूब बोगदा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या खालून जाणार आहे. यामुळे बोरिवलीच्या दिशेने पश्र्चिम द्रुतगती महामार्ग आणि ठाणे कडील ठाणे घोडबंदर रोड दरम्यान थेट संपर्क व्यवस्था निर्माण होईल. प्रकल्पाची एकूण लांबी ८ किमी आहे. यामुळे ठाणे ते बोरिवली हा प्रवास १२ किमीने कमी होईल आणि प्रवासाच्या वेळेत सुमारे एक तासाची बचत होईल.

गोरेगाव मुलुंड लिंक रोड या ६३०० कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पाच्या बोगद्याच्या कामाची पायाभरणी केली. गोरेगाव येथील पश्र्चिम द्रुतगती महामार्ग ते मुलुंड येथील पूर्व द्रुतगती महामार्ग या दरम्यान रस्ता जोडणे ही गोरेगाव मुलुंड लिंक रोड प्रकल्पाची कल्पना आहे.

गोरेगाव मुलुंड लिंक रोड प्रकल्पाची एकूण लांबी अंदाजे ६५ किलोमीटर आहे आणि पश्र्चिम उपनगरांना नवी मुंबई येथील नवीन प्रस्तावित विमानतळ आणि पुणे मुंबई एक्स्प्रेस वे शी थेट कनेक्टिव्हिटी प्रदान करेल.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा प्रारंभ देखील पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आला. हा एक परिवर्तनकारी आंतरवासिता कार्यक्रम असून १८ ते ३० या वयोगटातील तरुणांना कौशल्य सुधार आणि उद्योगाभिमुखतेच्या संधी देऊन तरुणांमधील बेरोजगारीची समस्या सोडवणे, हे यामागचे उद्दिष्ट आहे. यासाठी सुमारे ५५४० कोटी रुपये खर्च होणार आहे.

कल्याण यार्डाच्या पुनर्रचनेच्या कामाची पायाभरणी देखील पंतप्रधानांनी केली. कल्याण यार्डाच्या पुनर्रचनेमुळे लांब पल्ल्याच्या गाड्या आणि उपनगरी रेल्वे गाड्या यांच्या वाहतुकीचे पृथक्करण करण्यात मदत होईल. या पुनर्रचनेनंतर अधिक गाड्यांची वाहतूक हाताळण्यासंदर्भात यार्डाच्या क्षमतेत वाढ होईल, रेल्वेगाड्यांची कोंडी होणे कमी होईल आणि गाड्यांचे परिचालन करण्यासंदर्भात यार्डाच्या कार्यक्षमतेत सुधारणा होईल. यासाठी ८१३ कोटींचा खर्च अपेक्षित आहे.

नवी मुंबईमध्ये तुर्भे येथील गतिशक्ती मल्टीमोडल कार्गो टर्मिनल ३२,६०० चौरस मीटर्सहून अधिक क्षेत्रावर उभारले जाणार असून हे टर्मिनल स्थानिक जनतेसाठी अतिरिक्त रोजगार संधी निर्माण करेल आणि सिमेंट तसेच इतर वस्तूंच्या हाताळणीसाठी आवश्यक अतिरिक्त टर्मिनलची गरज पूर्ण करेल. हा प्रकल्प २७ कोटींचा असेल.

प्रधानमंत्री श्री.मोदी यांच्या हस्ते लोकमान्य टिळक टर्मिनस येथील नवे फलाट (प्लॅटफॉर्म) तसेच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मधील फलाट क्र. १० आणि ११ चा विस्तारीत भाग यांचे लोकार्पण देखील झाले. लोकमान्य टिळक टर्मिनसमधील नवे, अधिक लांबीचे फलाट जास्त लांबीच्या गाड्यांसाठी सुयोग्य ठरतील आणि प्रत्येक गाडीत अधिक प्रवाशांची सोय होईल. तसेच प्रवाशांच्या वाढलेल्या वाहतुकीचे नियमन करण्याची रेल्वे स्थानकाची क्षमता देखील यामुळे सुधारेल. यासाठी ६४ कोटींचा खर्च आला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकातील फलाट क्र. १० आणि ११ यांची लांबी ३८२ मीटरने वाढवण्यात आली असून या भागावर सावलीसाठी आच्छादन तसेच गाडी धुण्याच्या दृष्टीने या भागातील रेल्वे रुळांवर विशेष सोय देखील केलेली आहे. या विस्तारामुळे या फलाटाची क्षमता तब्बल २४ डब्यांची गाडी उभी राहण्याइतकी वाढली आहे. यासाठी ५२ कोटी रुपये खर्च आला आहे

## तर २८८ आमदारही पाडणार


स्थगित केलेलं उपोषण आंतरवालीत २० तारखेला सुरू करतोय. आता कठोर उपोषण होईल. आता मेलो तरी माघार नाही. पण मराठ्यांवर गुलाल मी टाकणार आहे. माझ्यापुढे दुसरा पर्याय नाही. मला मराठ्यांची शक्ती वाया घालवायची नाही, मला वाईट पाऊल उचलायचं नाही. त्यामुळे स्थगित केलेलं बेमुदत उपोषण २० जुलैपासून सुरू होणार, असं मनोज जरांगे म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, मराठ्यांनी २८८ उमेदवार उभे करायची की पाडायचे हे २० तारखेला तारीख जाहीर करू. सरकारला पुन्हा एकदा संधी देतो, मला मुंबईलाही यायचं नाही आणि तुमचे उमेदवारही पाडायचे नाहीत. सुधारले तर सुधारले, नाही सुधारले तर २८८ आमदारही पाडणार आणि मुंबईलाही जाणार, असा इशारा त्यांनी दिला.

# निफाडच्या ईश्र्वरी गाजरेची सीए पदाला गवसणी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

निफाड/प्रतिनिधी : शेतकरी आणि एकत्रित कुटुंब वेळप्रसंगी शेतीला हातभार अशया साऱ्या गराड्यात केवळ जिद्द चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर तसेच कुटुंबाचे पाठबळ यामुळे निफाड येथील ईश्र्वरी संजय गाजरे हिने नुकतीच सी ए परीक्षा उत्तीर्ण होत यशाला गवसणी घातली असून तिचे परिसरातून अभिनंदन होत आहे. निफाड च्या अचोळा नाला जवळ राहणारे संजय लक्षण गाजरे हे आई वडील .दोन बंधू भावजयी पुतणे .आणि स्वत:चे परिवारासह एकत्र राहतात .या कुटुंबाचा शेती हाच मुख्य व्यवसाय . मात्र शेतीवर अवलंबून न राहता संजय गाजरे यांनी मोबाईल रीपेअरिंग दुकान टाकत कुटुंबाला हातभार लावला .नंतर उद्योग क्षेत्रात पदार्पण करीत बेदाणा प्रकल्प .त्यानंतर इलेक्ट्रिक व्हेईकल पंप सुरू केला तर त्यांची पत्नी वर्षा गाजरे या देखील निफाड नागरी पतसंस्थेत लिपिक आहेत त्यांची .मोठी कन्या ईश्र्वरी हीचे पहिली ते दहावी पर्यंत चे शिक्षण वैनतेय विद्यालय निफाड मध्ये झाले दहावी मध्ये ९४ टक्के गुण मिळवले होते. या गुणांच्या जोरावर डॉक्टर इंजिनिअरिंगला सहज ॲडमिशन झाले असते तरीदेखील मनाशी खूनगाट बांधून सी एच व्हायचे या जिद्दीने ईश्र्वरी हिने पुढची वाटचाल सुरू केली .दहावीनंतर बीवायके कॉलेज नाशिक येथे कॉमर्सला ॲडमिशन घेतले त्याचबरोबर सीए चे क्लास जॉईन करून फाउंडेशन, सीए इंटरमिजिएट परीक्षा व फायनल परीक्षा पास होऊन सी ए ची पदवी मिळवली. कोरोना सारख्या कठीण कालावधीत देखील ऑनलाइन क्लास करून प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यश संपादन केले. तिच्या या यशाबद्दल विविध स्तरातील मान्यवरांकडून तिचे कौतुक वा अभिनंदन करण्यात येत आहे. इलो करत असताना बीवायके कॉलेजमध्ये स्टॅटेस्टिक या विषया मध्ये पहिला क्रमांक देखील ईश्र्वरीने मिळवलेला आहे. त्याबद्दल तिला प्रोफेसर पार्थसारथी अवॉर्ड ऑफ मेरिट बहुमान देवून इधघ कॉलेज कडून सन्मान करण्यात आलेला आहे. ईश्र्वरी गाजरे ही निफाड येथील प्रगतिशील शेतकरी लक्ष्मण संपतराव गाजरे यांचे नात व भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस संजय लक्ष्मण गाजरे व वर्षा संजय गाजरे यांची कन्या होय. शेतकरी कुटुंबातील एका साधारण मुलीने एवढे मोठे यश मिळवले त्याबद्दल तिचे अभिनंदन होत आहे.



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळामुळे सांस्कृतिक वारसा लाभला : आदेश बांदेकर

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्रीक्षेत्र अक्कलकोटला श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळामुळे सांस्कृतिक वारसा लाभला असून, उपस्थित माता भगिनींच्या चेहर्यातवरील आनंद पाहून भरून भारावलो अशी प्रतिक्रीया सुप्रसिध्द अभिनेते आदेश बांदेकर यांचा खेळ मांडियेला कार्यक्रमाच्या वेळी मनोगतातून व्यक्त केले. महाराष्ट्रभर गाजलेले लाडके भाऊजी म्हणजेच आदेश बांदेकर यांच्या कार्यक्रमासाठी महिलांची अक्षरशः झुंबड पडली होती. दैनंदिन जीवनात व्यस्त असलेल्या महिलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याच्या हेतुने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३७ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सव न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत असून, शनिवार दि. १३ जुलै रोजी सायंकाळी ७ वा. अभिनेते आदेश बांदेकर प्रस्तुत 'खेळ मांडीयेला' (खेळ, किस्से, गप्पा, साऱ्या कुटुंबासाठी) ह्या कार्यक्रमाने तिसरे पुष्प संपन्न झाले. याप्रसंगी आदेश बांदेकर बोलत होते. यंदाचे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. कार्यक्रमाचे सुरुवात गणेश वंदनाने करण्यात आली.

या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन श्री राजेराय मठाचे अध्यक्ष अँड.शरदराव फुटाणे-जाधव, हिरकणी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सौ.अलकाताई भोसले, सचिवा अर्पिताराजे भोसले, सौ.वैशाली लिंबीतोटे, माजी नागराधाक्षा अनिता खोबरे, उपाध्यक्षा रत्नमाला मचाले, न्यासाचे क्रियाशील सदस्य सरोजिनी मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान श्रींची प्रतिमा, नटराज व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



याप्रसंगी लकी ड्रॅचे कुपन देण्यात येत होते. मंचावर महिलांसह विविध खेळ, गप्पा, चर्चा करत कार्यक्रम मोठ्या उत्साहात मंगलमय वातावरणात पार पडला. विजेत्या महिलांना मानाच्या ५ पैठणी, २०० घड्याळ पारितोषिक म्हणून देण्यात आले.

महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांनाही आनंदाचे क्षण वेचता यावेत या अनुषंगाने महाराष्ट्रभर गाजत असलेले लाडके भाऊजी म्हणजेच आदेश बांदेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत खेळ मांडियेला संपन्न झाला. शेकडो माता-भगिनींनी या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या. सुप्रसिध्द अभिनेते आदेश बांदेकर व कलाकार यांच्यासह मान्यवरांचा न्यासाच्या वतीने सत्कार करण्यात आला. न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी व संजय कुलकर्णी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन संपन्न झाले.

यावेळी हिरकणी संस्थेच्या जयश्री मगर, स्वाती निकम, स्मिता कदम, पल्लवी नवले, कविता वाकडे, क्रांती वाकडे, संगीता भोसले, अंजना पवार, उज्वला भोसले, कोमल क्षीरसागर, सुवर्णा घाडगे, छाया पवार, रुपा पवार, माजी नगरसेविका अरुणा पवार, आरती पोतदार, चारुशीला कुलकर्णी व न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, बाबुराव कुलकर्णी, विश्र्वस्त भाऊ कापसे, संतोष भोसले, राजेंद्र लिंबीतोटे, ओंकारेश्र्वर उटगे, अॅड.संतोष खोबरे, दिलीप सिद्धे, शिवराज स्वामी, राजू इंगळे, शुभम इंगळे, मनोज निकम, प्रा.शरणप्पा आचलेर, राजेश माने कोल्हापूर, अरविंद शिंदे, शीतल फुटाणे, राजु नवले, निखील पाटील, प्रवीण घाडगे, गोटू माने, सौरभ मोरे, अमित थोरात, बाळासाहेब घाटगे, प्रसाद हुल्ले, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्र्वेता हुल्ले यांनी केले तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी रसिकप्रेक्षकांचे स्वागत व आभार मानले. उत्कृष्ठ लाईट व्यवस्था शंभूराजे इलेक्ट्रिकल यांनी केले.

### अन्नछत्र मंडळ हे सुंदर व पवित्र ठिकाण

**श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ हे सुंदर व पवित्र ठिकाण असून, सेवा करण्याची संधी मला लाभली. या कार्यक्रमा नंतर अमेरिकेतील १२ शहरात हा कार्यक्रम करण्याची संधी मला मिळालेली आहे. २० वर्षाच्या होम मिनिस्टर नंतर 'खेळ मांडीयेला' ह्या कार्यक्रमाने १५ लाख कि.मी.चा प्रवास पूर्ण होणार आहे.**

**–अभिनेते आदेश बांदेकर**

**गुणीजन गौरव : सौ.लता कुलकर्णी –आदर्श माता, सौ.पूनम माने – कार्यकारी अभियंता, गुण नियंत्रण विभाग कोल्हापूर, श्रीमती अहिल्या इंगळे – जि.प.शाळा कोन्हाळ्ळी यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.**

**गुणवंत विद्यार्थी गौरव : तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत उत्तम गुण मिळवलेल्या ६ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव न्यासाच्या वतीने करण्यात आला.**

**दि. १४ जुलै रोजी रविवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत परमपूज्य मौनतपस्वी श्री जडेय शांतलिंगेश्र्वर महास्वामीजी यांच्या शुभाशिर्वादाने सादरकर्ते कर्नाटकचे ख्यातनाम गायक राजेश कृष्णन व प्रसिध्द निवेदिका अनुश्री व अनुपम गौड आणि सहकारी बेंगळूर यांचा 'संगीत संजे' कन्नड कार्यक्रम सादर होणार आहे.**

# शाळा व्यवस्थापन अध्यक्ष श्री राजेश गोब्बुर यांचे निवड

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः जिल्हा परिषद कन्नड मुली शाळा, मैंदर्गी येथे शाळा व्यवस्थापन समिती नवीन गठीत करण्यात आले या समितीत सर्व दुर्बल घटक काना संधी देण्यात आले ५०% स्त्री ५०% पुरुष असे निवड करण्यात आले निवड झालेल्या सदस्यातून अध्यक्ष निवड करण्यात आले अध्यक्ष म्हणून श्री सागर गोब्बुर यांचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आले नूतन अध्यक्षांची सत्कार मावळते अध्यक्ष श्री सुरेश पाटील यांचे हस्ते करण्यात आले



तसेच नूतन सर्व सदस्यांचे सत्कार उपस्थित पालकांचे हस्ते करण्यात आले यावेळी गावातील प्रमुख व्यक्ती श्री तुकप्पा नागूर श्री काशिनाथ जकापुरे श्री कंट्टेप्पा मेंथे श्रीसुरेश नागोर श्री दयानंद बमनली श्री वसंत आरेनवरू श्री सिद्धप्पा जगपुरे आदींनी निवडीचा अगोदर शाळा व्यवस्थापन समितीचा कार्य याबद्दल चर्चा केले मार्गदर्शन केले त्यानंतर नवीन सदस्य निवड करण्यात आले या सर्व निवडीचे नियोजन मुख्याध्यापक महांतेश्र्वर कट्टीमनी यांनी सुनियोजित पार पाडले.

# शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी हिशोब शालार्थमधून मिळणार

## शिक्षकेतर महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजी खांडेकर यांच्या प्रयत्नांना यश

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजी खांडेकर यांनी शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक तसेच शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेत शालार्थ वेतन प्रणालीमधून भविष्य निर्वाह निधीचे हिशोब चालू आर्थिक वर्षापासून कर्मचाऱ्यांना मिळणार असल्याबाबतचे पत्र काढण्यात आले आहे. शिक्षकेतर महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजी खांडेकर यांच्या अथक प्रयत्नाला यश आले. शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अनेक अडचणी,त्रास व हेलपाट्यापासून सुटका होणार असून वेळेची बचत होणार आहे.



राज्यातील खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी हिशोब हे शालार्थ वेतनप्रणालीतून मिळणेसाठी शिक्षकेतर महामंडळाने शासनासोबत वेळोवेळी पत्रव्यवहार केला होता. सन २०१४ पासून राज्यातील खाजगी अनुदानित शाळातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी शालार्थ वेतनप्रणाली सुरु करण्यात आलेली आहे. या वेतन प्रणालीमधून शासकीय अनुदानित शाळातील सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन ऑनलाईन पद्धतीने होण्यास सुरुवात झाली. वेतन ऑनलाइन होत असतांना कर्मचार्यांच्या वेतनातून दरमहा कपात होणार्या भविष्य निर्वाह निधीसारख्या महत्त्वाचे हिशोब मात्र शालार्थ वेतन प्रणालीमधून मिळत नसल्याने अनेक शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेत शालार्थ वेतन प्रणालीमधून भविष्य निर्वाह निधीचे हिशोब चालू आर्थिक वर्षापासून कर्मचाऱ्यांना मिळणार असल्याबाबतचे पत्र काढण्यात आले आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात किती रक्कम जमा आहे याचा हिशोब तात्काळ मिळणार असल्याने राज्यातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

**भविष्य निर्वाह निधीचे हिशोबची कार्यवाही ऑनलाईन करणेसाठी राज्य शिक्षकेतर महामंडळ आग्रही होते. कर्मचाऱ्यांच्या पावत्या,हिशोब वेळेवर मिळत नव्हते,अग्रीमसाठी कागदपत्रे जुळवा जूळव करणे जिकरीचे होत होते.आपलाच पैसा आपल्याच एखाद्या कामासाठी वेळेवर मिळत नव्हता. पुन्हा वेळेचा अपव्यय होत होता. ऑनलाईनमुळे या सर्व त्रासातून मुक्तता होणार आहे. शासनाच्या गळी उतरवून प्रत्यक्ष कार्यवाहीबाबत पत्र काढणेसाठी महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजी खांडेकर यांनी सतत पाठपुरावा केला.**

यामुळे यापुढे शिक्षक शिक्षकेतर कर्मचार्यांना वेतन पथक कार्यालयात जावे लागणार नाही. शालार्थ वेतन प्रणालीमधूनच आपला हिशोब शाळेत बसून मिळणार असल्याची माहिती सरकार्यवाह शिवाजी खांडेकर यांनी दिली. शासनाच्या या निर्णयाबद्दल राज्य अध्यक्ष अनिल माने,सरकार्यवाह शिवाजी खांडेकर,कार्याध्यक्ष मोरेश्र्वर वासेकर तसेच सर्व पदाधिकारी यांचे पुणे विभागाचे कार्यवाह गोवर्धन पांडुळे,सोलापूर जिल्हाध्यक्ष रवी सुर्वे, जिल्हा कार्यवाह मुस्ताक शेतसनदी, अक्कलकोट तालुकाध्यक्ष चेतन जाधव यांच्यासह राज्यातील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# सुरक्षा रक्षक दलातील सैनिक यशवंत गवळी यांचे दु:खद निधन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

वागदरी :मुर्टा ता.तुळजापूर येथील मुळ रहिवासी असलेले व केंद्र शासनाच्या राष्ट्रीय औद्योगिक सुरक्षा दलात कार्यरत असलेले यशवंत विश्र्वंभर गवळी यांचे दि.१२ जुलै २०२४ रोजी नाशिक येथे कर्तव्यावर असताना हृदय विकाराच्या तिव्र झटक्याने दु:खद निधन झाले. दिवंगत यशवंत गवळी हे केंद्र शासनाच्या राष्ट्रीय औद्योगिक सुरक्षा दलात सैनिक म्हणून भरती झाल्यानंतर देशात विविध ठिकाणी दिवटी बजावली असून नुकतेच दिल्ली येथून भारतीय मुद्रानालय नाशिक येथे त्यांची बदली झाली होती.नाशिक येथे कर्तव्यावर असताना त्यांना हृदय विकाराचा तिव्र झटका आल्याने त्यांचे दि.१२जुलै २०२४ रोजी दु:खद निधन झाले.नाशिक येथून त्यांचे पार्थिव मुर्टा येथे त्यांच्या मुळ गावी आणण्यात आले.दि.१३ जुलै रोजी गावातून अंत्ययात्रा काढूण त्यांच्या शेतात शासकीय इतमामात नंतर बौद्ध धम्म संस्कारानुसार त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्र्चात पत्नी,एक मुलगी,एक मुलगा,दोन भाऊ, पुतणे,असा मोठा परिवार आहे.या प्रसंगी उपस्थित जनसमुदायानी त्यांना भावपूर्ण आदरांजली वाहिली.



# डुबेरे जनता विद्यालयात पालक-शिक्षक व माता-पालक संघाची स्थापना

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सिन्नर/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचलित डुबेरे येथील जनता माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात पालक -शिक्षक संघ व माता- पालक संघाची स्थापना करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष विठ्ठल वामने होते. व्यासपीठावर शालेय समितीचे अध्यक्ष नारायणशेठ वाजे,माजी सरपंच शरद माळी, अनिल वारुंगसे,शंकरराव वामने,कारभारी वारुंगसे ,अर्चना ढोली,अण्णासाहेब वारुंगसे,रामदास वारुंगसे ,सुदाम पडवळ आदी उपस्थित होते. पालक-शिक्षक संघाच्या अध्यक्षपदी विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे ,उपाध्यक्षपदी माणिक निवृत्ती वारुंगसे, सचिवपदी उपशिक्षक राजेंद्र गांगुर्डे,सहसचिव सचिन कैलास वामने यांची तर माता पालक संघाच्या उपाध्यक्ष- माधुरी ढोली ,सचिव सीमा गोसावी,सहसचिव- अनिता भडांगे यांची निवड करण्यात आली. यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.




तसेच विशाखा समितीच्या उपाध्यक्ष म्हणून अर्चना ढोली ,सचिव सुषमा थोरात व सहसचिव म्हणून चित्रा पडवळ यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून गणेश वाजे ,किरण पावसे, संदीप वारुंगसे, दिलीप गाडेकर, सुदाम पावसे,महेश्र्वर जाधव, गायत्री वारुंगसे ,मनीषा पावसे आदींची निवड करण्यात आली यावेळी सुदाम पडवळ,माणिक वारुंगसे, गणेश माळी, सुनील ढोली ,गणेश वाजे ,दिलीप गाडेकर ,अनिल वारुंगसे आदींनी विचारलेल्या प्रश्र्नांना व झालेल्या चर्चेला मुख्याध्यापक रामदास वाजे यांनी समर्पक उत्तरे दिली. या उत्तरांनी उपस्थित पालकांनी समाधान व्यक्त केले . यावेळी बोलताना मुख्याध्यापक वाजे म्हणाले की,शाळेच्या प्रगतीसाठी पालक व शिक्षकांनी सामूहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे.शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या शिस्त, गुणवत्ता वाढीसाठी विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येणार आहे. निवड झालेल्या सर्व सदस्य व उपाध्यक्ष यांचे अभिनंदन करून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा विद्यालयातर्फे सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठलतात्या वामने म्हणाले की,पालकांनी विद्यार्थ्यांना मोबाईल देवू नये.यावेळी बोलताना नारायणशेठ वाजे यांनी देखील शाळेला येणाऱ्या अडचणी व समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास होण्यासाठी सर्वांनी मिळून सामूहिक प्रयत्न करावे.विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षांना सामोरे जावे असे आव्हान वाजे यांनी केले.विद्यालयाच्या प्रभारी मुख्याध्यापकपदी पर्यवेक्षक रामदास वाजे यांची नियुक्ती झाल्याबद्दल शालेय समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. प्रास्तविक आर.बी. गांगुर्डे यांनी केले. सूत्रसंचालन पी.आर. करपे यांनी तर आभार सोमनाथ गिरी यांनी मानले.

# भक्ती सागर येथे प्रशासनाच्या आगाऊ प्लॉटस नोंदणी आवाहनाला दिंडीचालकांचा प्रतिसाद

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा दि. १७ जुलै रोजी साजरा होत आहे. आषाढी यात्रा सोहळ्यासाठी येणाऱ्या दिंड्यांना वास्तव्यासाठी भक्तीसागर (६५ एकर) येथे जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या ठिकाणी ४९७ मोफत प्लॉटस भाविकांना तंबू, राहुट्या उभारुन वास्तव्य करण्यासाठी देण्यात येत आहेत. दि.१३ जुलै पर्यंत ३७४ प्लॉट तर ६५ एकर शेजारील खुल्या जागेतील १४३ प्लॉटचे वाटप करण्यात आले आहे. या ठिकाणी भाविकांना आवश्यक सर्व सुविधा प्रशासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. भक्ती सागर येथील आगाऊ प्लॉटस नोंदणीबाबत प्रशासनाच्या आवाहनाला दिंडी चालकांनी उत्तम प्रतिसाद दिला असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

आषाढी यात्रा सोहळ्यासाठी संत ज्ञानेश्र्वर माऊली व संत तुकाराम यांच्या पालख्यांचे जिल्ह्यात दि. ११ व १२ जुलै रोजी आगमन झाले आहे. तसेच अनेक संतांच्या पालख्या, दिंड्यांचा सोलापूर जिल्ह्यात प्रवेश झाला. पालखी सोहळ्याबरोबर येणाऱ्या वारकरी-भाविकांना पालखी तळांवर, मार्गावर प्रशासनाकडून सर्व आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. यात्रा कालावधीत पंढरपूरात येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये. तसेच त्यांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी दिडींच्या मुक्कामासाठी भक्ती सागर (६५ एकर) तसेच पंढरपूर शहरालगत नव्याने पाच ठिकाणी मुलभूत सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. ६५ एकरावर दिंड्या येण्यास सुरुवात झाली असून प्रथम येणाऱ्या दिंड्याना प्राधान्य देण्यात येत आहे

भक्ती सागर (६५ एकर) येथे भाविकांना निवाऱ्यासोबत पिण्याचे शुद्ध पाणी, मुबलक शौचालय, वीज, अन्नपदार्थ शिजवण्यासाठी गॅस वितरण, पोलीस संरक्षण, प्रथमोपचार केंद्र स्वच्छता आदी सुविधा या ठिकाणी दिल्या जातात. या ठिकाणी भाविकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आपत्कालीन मदत केंद्र स्थापन करण्यात आले आहे. भक्ती सागर (६५ एकर ) येथे प्रशासकीय यंत्रणा सुसज्ज व सुरळीतपणे काम करण्यासाठी सेक्टर मॅनेजर म्हणून तहसिलदार सचिन मुळीक यांची नेमणूक करण्यात आली आहे. भाविकांना प्लॉटस वाटप करणे, अडीअडचणी सोडवणे, आपत्कालीन प्रतिसाद केंद्र व त्यावर नियुक्त सेक्टर मॅनेजर व त्याचे अधिनस्त कर्मचारी २४ तास कार्यान्वित असणार आहेत. वारकरी भाविकांनी भक्ती सागर (६५ एकर) व नव्याने ५ ठिकाणी निर्माण करण्यात आलेल्या उपलब्ध सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहनही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

### भाविकांना ६५ एकर येथे ३७४ प्लॉटचे वाटप : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

# आषाढी यात्रेनिमित्त वारकरी व भाविकांना देण्यात आलेल्या सोयी सुविधाची जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडून पाहणी

## पंढरपूर शहरात येणाऱ्या वारकरी व भाविकांना उत्कृष्ट सोयी सुविधा देण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधी: संपूर्ण महाराष्ट्राची आध्यात्मिक राजधानी असलेल्या श्री क्षेत्र पंढरपूर येथे दिनांक १७ जुलै २०२४ रोजी आषाढी यात्रा भरत असुन येणा-या लाखो भाविक, वारक-यांना प्रशासनाच्या वतीने चांगल्या दर्जेदार सोयी सुविधा उपलब्ध होण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद सातत्याने प्रयत्नशील आहेत. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन चांगल्या सुविधा उपलब्ध करून देत आहे. या सर्व सुविधांची पाहणी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केली. यावेळी नगरपरिषदेचे प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, तहसीलदार सचिन लंगुटे यांच्या समवेत केली.

**शौचालयाची पाहणी** : यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी स्वतः प्रत्येक ठिकाणी जाऊन शौचालयाची व्यवस्था, त्या ठिकाणी पुरेसे पाणी उपलब्ध आहे का? स्वच्छता ठेवण्यात आली आहे का व वारकऱ्यांना शौचालयाचा वापर केल्यानंतर हात धुण्यासाठी हँडवॉश ची ही सोय या ठिकाणी करण्यात आले आहे त्याची पाहणी केली. काही शौचालये स्वतः जिल्हाधिकारी यांनी उघडून पाहणी केली आहे. शौचालय साफसफाई करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करण्याचे निर्देश देऊन शौचा उचलण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सक्षम मशीन उपलब्ध करण्याचेही त्यांनी सुचित केले. पंढरपूर शहर व परिसरात सुलभ इंटरनॅशनल शौचालयाची जेवढी शौचालये असतील ती सर्व शौचालये दिनांक १५ ते २१ जुलै २०२४ या कालावधीत भाविकांना विनामूल्य उपलब्ध करून देण्याबाबत जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सुचित केलेले आहे.

**पंढरपूर शहरातील अतिक्रमण काढण्यासाठी विशेष मोहीम** : पंढरपूर नगर परिषदेच्या वतीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या सूचनेनुसार पंढरपूर शहरा मध्ये येणा-या लाखो भाविकांना यात्रा कालावधीमध्ये पंढरपूर शहरामध्ये दर्शनासाठी जाताना किंवा मंदिर परिसर महाद्वार घाट व प्रदक्षिणा मार्गावर दिंडी घेऊन जात असताना कोणतीही अडचण येऊ नये म्हणून तसेच नगर परिषदेने अर्बन बँक ते नाथ चौक, स्वा.सावरकर पुतळा ते महाद्वार, अंबाबाई पटांगण, चंद्रभागा वाळवंट व इतर रस्त्यांवरील अतिक्रमणे काढण्यासाठी विशेष मोहिम हाती घेऊन पोलीस प्रशासनाच्या मदतीने अतिक्रमण काढण्याचे काम चालु आहे.

**वाहनासाठी १३ ठिकाणी पार्किंगची सुविधा व सुरळीत वाहतुकीचे नियोजन** : पंढरपूर शहरामध्ये येणारी वाहने मुख्य रस्त्यावर किंवा प्रदक्षिणा मार्गावर येवुन भाविकांना चालताना अडथळा अथवा त्रास होवु नये म्हणुन सर्व ठिकाणी लोखंडी बॅरिकेटिंग करण्यात आलेले आहे. तसेच यात्रेच्या निमित्ताने पंढरपूर शहरामध्ये भाविकांच्या मोठ्या प्रमाणात येणा-या वाहनांची सोय व्हावी म्हणुन १३ ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच वाळवंटात येणा-या यात्रेकरुंना चालण्यासाठी व पाण्याचे टँकर, जेटिंग मशीन, आरोग्य विभागाची वाहने जाणे-येणेसाठी जुना पुल ते पुंडलिक मंदीरापर्यंत रस्त्याची आखणी करण्यात आली आहे.

**हायमास्ट दिवे** : पुंडलिक मंदीर ते दगडी पुलापर्यंत ९ हायमास्ट दिवे, प्रत्येक घाटासमोर असलेल्या लोखंडी पोलवर २०० वॅट एलईडी दिवे लावण्यात आले असुन यात्रा कालावधीत प्रथमच कायमस्वरूपी लखुबाई मंदिर घाट, उद्धव घाट, कुंभार घाट व चंद्रभागा घाट चार ठिकाणी स्टेडियम वर असणारे फ्लड लाईट चे मोठे दिवे बसविण्यात येणार आहे सदर दिव्यांचा प्रकाश संपुर्ण वाळवंटात पडणार आहे. त्याचप्रमाणे यात्रेकरुंच्या सोईसाठी संपुर्ण दर्शन बारी मार्ग, ६५ एकर मध्ये १६० एलईडी दिवे व ६ हायमास्ट बसविण्यात आले आहेत. तसेच ६५ एकर भक्ती सागर मध्ये असलेल्या १२ युनिटमध्ये असलेल्या १८०० शौचालयामध्ये विजेची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अनिल नगर येथील पाण्याच्या टाकीवरुन स्वतंत्र पाईप लाईन द्वारे यात्रेकरुंना पिण्याचे पाणी मिळावे या हेतुन नदीच्या वाळवंटामध्ये ७४ नळ बसविण्यात आले आहेत तसेच भक्ती सागर येथेही पिण्याची पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

**स्वच्छता मोहीम** : तसेच वाळवंटात, ६५ एकर व पत्राशेड दर्शनबारी येथे विशेष स्वच्छता मोहिम राबविण्यात आली असुन यात्रेपुर्वी संपुर्ण वाळवंट स्वच्छ करणेत आले असुन दररोजच्या दररोज नदीपात्र स्वच्छ राहण्याच्या दृष्टीने २०० सफाई कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

**२४ तास अग्निशमन दल सज्ज**: तसेच नदी पात्र, पत्राशेड दर्शनबारी, ६५ एकर, मंदिर परिसरात व शहरात आगीची दुर्घटना होवु नये म्हणुन महत्वाच्या ठिकाणी २४ तास अग्निशमन वाहने उभी करण्यात आली आहेत. वाखरी पालखी तळ, पत्रा शेड, नविन अग्निशमन केंद्र, चंद्रभागा नदी वाळवंट,६५ एकर. श्री संत तुकाराम भवन येथे अग्निशमन यंत्रणा उभी करण्यात आली आहे तसेच मंदीरा भोवती आग लागल्यास अग्निशमन वाहनास त्वरीत पाणी उपलब्ध व्हावे म्हणुन मंदीराच्या दक्षिण बाजुस फायर हायड्रेट उभा केला आहे.

**पिण्याच्या पाण्याची व्यवस्था** : भाविकांसाठी यात्रा कालावधीमध्ये मंदीर परिसरात पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. गोपाळपुर रोड दर्शन बारी पत्रा शेडमध्ये पिण्याचे पाणी नळ कनेक्शन द्वारे उपलब्ध करुन दिले आहे. या ठिकाणी शौचालयाची व्यवस्था करण्यात आली आहे. शहरात एकुण ६५ हातपंप व मंदिर परिसरातील १२ विद्युत पंपाद्वारे यात्रेकरुंना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे. तसेच यात्रा कालावधीत पिण्याचे पाणी किमान १५० टँकर द्वारे संपुर्ण शहरात विशेषतः भक्ती सागर वाळवंट पालखी तळ पत्राशेड ज्या ठिकाणी मठांची संख्या जास्त आहे त्याठिकाणी पाणी पुरविण्यात येणार आहे.

**भाविकांसाठी शौचालयाची उपलब्धता** : शौचालय नियोजनामध्ये तिर्थक्षेत्र विकास आराखड्याअंतर्गत व सुलभ शौचालयाची २९ ठिकाणीं २०५४ सीट्स, नगरपरिषदेची कायमची २५ ठिकाणी १७६ सीट्स, ६५ एकर परिसरातील कायम स्वरुपी १२ ठिकाणी १८६४ सीट्स, प्री फॅब्रिकेटेड (नदी वाळवंट, ६५ एकर, पत्राशेड दर्शनबारी, शहरात विविध ठिकाणी) असे एकुण ७० ठिकाणी १९००सीट्स असे शौचालयाचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच यात्रा कालावधीत मोकाट जनावरे पकडुन त्यांना नगरपरिषदेने नव्याने बांधण्यात आलेल्या कोंडवाड्यामध्ये कोंडण्यात येत आहे.

**आरोग्य सुविधा**: शहरात यात्रा कालावधीमध्ये पंढरपूर नगरपरिषदेच्यावतीने, उपजिल्हा रुग्णालय व तालुका आरोग्य अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने वतीने वाखरी पालखी तळ,पत्राशेड, दर्शनबारी , पोलीस संकुल, दर्शन मंडप, ६५ एकर , चंद्रभागा वाळवंटात वेदांत भक्त निवास, नागरी आरोग्य केंद्र काळा मारुती व सारडा भवन, श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात यात्रेकरुंच्या सोईसाठी प्रथमोपचार केंद्र उघडण्यात आले आहेत. तसेच यात्रा कालाधीमध्ये संपुर्ण यात्रेवर नियंत्रण ठेवण्यासाठी वाखरी पालखी तळ, ६५ एकर भक्ती सागर, नदी वाळवंट, गोपाळपुर रोड दर्शन बारी पत्रा शेड, पंढरपूर नगरपरिषद मुख्य कार्यालय या ठिकाणी आपातकालिन व्यवस्थापन केंद्राची (EOC) स्थापना केलेली आहे.

यात्रा व्यवस्थित पार पडावी म्हणुन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, उपविभागीय अधिकारी तथा प्रशासक सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली, मुख्याधिकारी डॉ.प्रशांत जाधव, उपमुख्याधिकारी सुनिल वाळुजकर, नगरअभियंता नेताजी पवार, आरोग्य अधिकारी शरद वाघमारे व नागनाथ तोडकर, पाणीपुरवठा अभियंता राजकुमार काळे, अभियंता प्रविण बैले, सुहास झिंगे, सोमेश धट, कर अधिकारी सुप्रिया शिंदे, जनसंपर्क अधिकारी अस्मिती निकम, विद्युत अभियंता राजकुमार सपाटे, रोडलाईट इन्स्पेक्टर संतोष क्षिरसागर, अग्निशमन अधिकारी संभाजी कार्ले, हिवताप अधिकारी शुभांगी अधटराव, सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी प्रयत्नशील आहेत.

तसेच यात्रा कालावधीमध्ये शहरातील सर्व स्थानिक नागरीकांनी स्वच्छता व आरोग्य सुव्यवस्थीत राहण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

### नगर परिषदेच्या वतीने १५०० सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती

यात्रा कालावधीत पुर्वी शहरामध्ये विशेष स्वच्छता मोहिम राबविण्यात आली असुन यात्रा कालावधीमध्ये शहरात स्वच्छता रहावी म्हणुन नियोजन बद्ध कार्यक्रम आखण्यात आला आहे. नगरपरिषदेच्यावतीने १५०० सफाई कर्मचा-यांद्वारे शहरात व उपनगरात स्वच्छता करण्यात येत आहे. तसेच यात्रा कालावधीमध्ये शहर, वाळवंट, ६५ एकर, पत्रा शेड दर्शनबारी येथे दररोजच्या दररोज स्वच्छता करण्यात येणार आहे. प्रत्येक मोठ्या मठांमध्ये स्वतंत्ररित्या कचरा साठविण्यासाठी लेखी पत्राद्वारे सुचना देण्यात आलेल्या असुन कोणत्याही परिस्थितीत कचरा बाहेर टाकु नये सर्व कचरा घंटागाडी कडे द्यावा म्हणुन कळविण्यात आले आहे. तसेच ४१ घंटागाडी द्वारेही कचरा गोळा करण्याचे काम यात्रा कालावधीत अहोरात्र चालु राहणार आहे. शहरामध्ये कचरा त्वरीत उचलण्यासाठी आरोग्य विभागाकडील ४ टिपर, २ कॉम्पॅक्टर, १ डंपरप्लेसर, ४ डंपिंग ट्रॉलिने व जेसीबीच्या सहाय्याने दररोज १०० ते १२० टन कचरा उचलण्यात येणार आहे. नदीपात्र, ६५ एकर, पत्राशेड दर्शन बारी व शहरात गर्दीच्या ठिकाणी ५०० पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे उभारण्यात आली आहेत. तसेच नागरी हिवताप विभागामार्फत शहरामध्ये डेंगु अथवा इतर आजाराचा प्रादुर्भाव होवु नये म्हणुन विशेष मोहिम हाती घेतली असुन कंटेनर सर्व्हे, औषध फवारणी व फॉगिंग मशीन द्वारे धुर फवारणी करण्यात येत आहे. बायोकल्चर तंत्राचा वापर करुन जैविक पद्धतीने नदीच्या पात्रात होणारी घाण दुर्गंधीयुक्त वास कचरा व घाण कुजविण्याच्या दृष्टीने फवारणी करण्यात येत आहे.

**आषाढी यात्रेमध्ये करण्यात आलेल्या विशेष बाबी**

✻ संपूर्ण पंढरपूर शहरातील असलेल्या पथदिव्यावर एलईडी च्या माळा सोडण्यात येऊन सुशोभीकरण करण्यात आले आहे. ✻ नवीन पूल चंद्रभागा वाळवंटामध्ये लेझर किरण द्वारे लेझर लाईट सोडण्यात येणार आहेत.

✻ चंद्रभागा वाळवंटामध्ये भिंतीवर प्रोजेक्टर द्वारे सर्व युगपुरुषांच्या व संतांच्या माहिती दाखवण्यात येणार आहे ✻ शहरांमधील प्रत्येक मुख्य चौकामध्ये वारकऱ्यांचे पुतळे बसवण्यात आले आहेत ✻ ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात टॉयलेट्स लावण्यात आले आहेत ते तुंबून नाहक भाविकांना त्रास होऊ नये म्हणून त्या ठिकाणी सक्शन मशीन मोठ्या प्रमाणात ठेवण्यात आले आहेत ✻वाखरी पालखीतळ, ६५ एकर, चंद्रभागा वाळवंट येथे शौचालयाच्या वापरासाठी वेगळी व्यवस्था ठेवून पाण्याचे टँकर उभा करण्यात आले आहेत

# जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या शिष्टाईमुळे धनगर समाजाचे आंदोलन स्थगित

✻ जिल्हाधिकारी यांच्याकडून कडून धनगर समाजाच्या तीन पैकी दोन मागण्या पूर्ण, एक मागणी शासन स्तरावरील ✻ धनगर समाजाच्या शिष्टमंडळाकडून सकारात्मक प्रतिसाद

**दैनिक यशसिध्दि न्यूज**



सोलापूर/प्रतिनिधी: धनगर समाजाने त्यांच्या विविध मागण्यांसाठी आषाढी एकादशीच्या शासकीय पूजा वेळेस आंदोलन करण्याचा इशारा दिलेला होता, त्या पार्श्र्वभूमीवर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पंढरपूर येथे धनगर समाजाच्या शिष्ट मंडळाशी त्यांच्या विविध मागण्याच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा केली.

शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांच्याकडे पंढरपूर येथे पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळा सुशोभीकरणासाठी निधी उपलब्ध करणे, दुसरी मागणी पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने सांस्कृतिक भवनसाठी जागा व त्यासाठी निधीची तरतूद, तर अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या धर्तीवर धनगर समाजातील तरुणांना उद्योग व्यवसायासाठी बिना व्याजी व विना कारण तीस लाखापर्यंतचे कर्ज उपलब्ध करून देणे अशा तीन मागण्या केल्या. शिष्ट मंडळाच्या तीन मागण्या पैकी पहिल्या दोन मागण्या जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी तात्काळ मान्य केल्या व तिसरी मागणी ही शासन स्तरावरील असून त्याबाबत शासनाशी चर्चा करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी शिष्टमंडळाच्या प्रतिनिधीला सांगितले. व उपरोक्त दोन मागण्या मान्य करून पुढील एका महिन्याच्या आत त्या पूर्ण होणार असल्याने धनगर समाजाने आषाढी एकादशीला करण्यात येत असलेले आंदोलन मागे घ्यावे, असे त्यांनी सांगितले.

या सर्व पार्श्र्वभूमीवर धनगर समाजाच्या शिष्टमंडळांतील उपस्थित प्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी यांनी स्वतः पुढाकार घेऊन शिष्ट मंडळाच्या तीन पैकी दोन मागण्या मान्य केल्याबद्दल समाधान व्यक्त करून त्यांनी ही सकारात्मक भूमिका स्वीकारून तूर्तास आंदोलन मागे घेत असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री महोदयांच्या भेटीनंतर पुढील दिशा ठरविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, उपविभागीय पोलिस अधिकारी अर्जुनसिंह भोसले, तहसीलदार सचिन लंगुटे तर धनगर समाज शिष्टमंडळाचे विश्रांती भुसनर, माऊली हलनवर, आदित्य फत्तेपूरकर, सुभाष मस्के, सोमनाथ ढोणे, पंकज देवकाते, प्रशांत घोडके, संजय लवटे, प्रसाद कोळेकर, अजय देशमुख, सतीश लवटे व अन्य प्रतिनिधी उपस्थित होते.

# स्वेरीकडून आषाढी वारी निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

## आज वारीपूर्व स्वच्छतेचा निर्मल वारी-हरित वारी हा उपक्रम संपन्न



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी: आषाढी एकादशी बरोबरच इतर महत्वाच्या तीनही मोठ्या वाऱ्यांमध्ये स्थापनेपासूनच स्वेरीचे योगदान राहिलेले आहे. पंढरीत वारीनिमित्त परंपरेनुसार संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्र्वर माऊली, संत सोपान काका, संत मुक्ताबाई, संत तुकाराम महाराज, संत एकनाथ महाराज, संत नामदेव महाराज, संत जनाबाई, संत गोरोबा काका (गोरा कुंभार), संत सेना महाराज अशा अनेक संतांच्या मानाच्या पालख्या पंढरीत येत असतात त्यामुळे पंढरीत वारकऱ्यांची मांदियाळी भरते. वारकऱ्यांच्या सेवेसाठी आरोग्य विभाग, स्थानिक प्रशासन, नगरपालिका व सुरक्षा बंदोबस्तासाठी पोलीस प्रशासन यांचाही मोठा ताफा असतो. यावेळी पंढरपुरातील गर्दीचे नियोजन करण्यासाठी तसेच वारकऱ्यांच्या सेवेसाठी स्वेरीकडून प्रशासनास सहकार्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. यावर्षीही पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग, स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर (ऑटोनॉमस), स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, (पॉलिटेक्नीक), पंढरपूर स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर व स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी (पॉलिटेक्नीक), पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्वच्छ वारी-स्वस्थ वारी-निर्मल वारी-हरित वारी -आषाढी वारी २०२४' चे आयोजन केले गेले आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून आज वारी पूर्व स्वच्छतेचे गोपाळपुरात आयोजन करण्यात आले होते. स्वेरीच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

यंदाच्या आषाढी वारीच्या अगोदरच स्वेरीतर्फे वारकऱ्यांच्या स्वागतासाठी व सेवेसाठी वारीपुर्व स्वच्छता अभियान राबविण्यात आले आहे. गोपाळपूर (ता. पंढरपूर) ते मध्यप्रदेश भवन या दरम्यान साधारण दोन किलोमीटरचा दुतर्फा परिसर स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व कॉलेज ऑफ फार्मसीच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील तब्बल १८० विद्यार्थ्यांनी दोन तासात चकाचक केला. गोपाळपूर चौकात या स्वच्छता मोहिमेचे उदघाटन झाले. यावेळी गोपाळपूरचे सरपंच अरुण बनसोडे, उपसरपंच बाळासाहेब आसबे, संस्थेचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्यासह मान्यवरांनी 'वारीचे महत्व व वारकऱ्यांची मनोभावे सेवा' यावर बहुमोल भाष्य केले. सर्व ग्रामस्थ, स्वेरीचे शिक्षकवर्ग, विद्यार्थी यांनी हातात झाडू, खराटा, टोपली, खोरे आदी साहित्य वापरून स्वच्छता मोहीम राबविली. स्वेरीचे विद्यार्थी तहानभूक हरवून स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले होते. स्वेरीच्या चिन्हाने अंकित असलेल्या पांढऱ्या रंगाचे टी शर्ट परिधान केलेले विद्यार्थी व शिक्षक स्वच्छता करत असताना भाविकांनी पाहण्यासाठी गर्दी केली होती. संस्थेचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.एम.एस. मठपती, प्रथम वर्ष इंजिनिअरींगचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. रविकांत साठे, डॉ. एम. एम. आवताडे, प्रा. एस.बी. खडके, प्रा. बी.टी. गडदे, प्रा.जी.जी. फलमारी, प्रा.पी. व्ही. पडवळे, प्रा.एम.ए.सोनटक्के, प्रा. एस. डी. माळी, फार्मसीचे प्रा. एच.बी.बनसोडे, इतर प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी हे आता वारीच्या काळात, तीर्थ क्षेत्र पोलीस मदत केंद्र, पिण्याच्या शुद्ध पाण्याचे वाटप, पोलीस मित्र, निर्मल वारी, स्वेरीतील ग्रामीण मानव संसाधन विकास केंद्र (आर.एच.आर.डी.एफ.) च्या माध्यमातून शेतकरी असलेल्या वारकऱ्यांना बी-बियाणे, नवीन तंत्रज्ञान, अवजारे आदीची माहिती देवून वारकऱ्यांची सेवा केली जाणार आहे. आज पार पडलेल्या 'वारीपूर्व स्वच्छता मोहिमे'च्या उदघाटन प्रसंगी उदय पवार, विक्रम आसबे, अजय जाधव, बापू लेंगरे, दामाजी कारखान्याचे माजी कार्यकारी संचालक साळुंखे, यांच्यासह नागरिक व वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.